दिनांक 24/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.72

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी झाडे कटर मशीन, लॉन कटर मशीन, खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरीक्षक यांची दिनांक 20/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी बगिचामधील झाडे, लॉन, डिव्हायडरमधील झाडे तसेच इतर ठिकाणची झाडे कटींग करणेसाठी झाडे कटर मशीन, लॉन कटर मशीन, डिव्हायडर कटर मशीन खरेदी करणे आवश्यक आहे. सदरच्या कटर मशीन खरेदी केल्याने कामे करणे सुलभ होईल.

तरी विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी झाडे कटर मशीन, लॉन कटर मशीन, डिव्हायडर कटर मशीन खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 24/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 73

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद संगणक विभागाकडील संगणक सर्वर नेटवर्किंग देखभाल दुरूस्ती संगणकीय साहित्य CCTV बसविणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 23/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद संगणक विभागाकडील संगणक सर्वर नेटवर्किंग देखभाल दुरूस्ती संगणकीय साहित्य CCTV बसविणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) मे मलिक इलेक्ट्रिकल्स
2) में.फोकस सिस्टीम (अर्जुन सहदेव गायकवाड)
3) मे.विशाल पॉवर अँड इंजिनिअर्स

उपरोक्त ई निविदापैकी में.फोकस सिस्टीम (अर्जुन सहदेव गायकवाड) यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 24/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 74

विषय – विटा नगरपरिषद कार्यालयीन इमारतीमधील शौचालयाची दूरुस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगर अभियंता यांची दिनांक 23/09/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगरपरिषद कार्यालयीन इमारतीमधील शौचालयाची दूरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर इमारती मधील नगरपरिषदेचे गाळे आहेत. सदर गाळयामध्ये मोठया प्रमाणावर गळती होत असल्याने सदर गाळा धारक यांची वारंवार तक्रार होत आहे. तसेच त्यांचे गाळयामधील साहित्य खराब होत आहे. तरी सदर गाळयाच्या वरील मजल्यावरील शौचालय आहे. तेथील शौचालयाची दुरुस्ती केल्याने सदर गाळा धारक यांचे गाळया मधील गळती थांबणार आहे.

तरी विटा नगरपरिषद कार्यालयीन इमारतीमधील शौचालयाची दूरुस्ती करणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम नगरपरिषद फंडातून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 24/09/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 75

विषय – विटा नगरपरिषद इमारत मधील भाडेने दिलेल्या एम.एस.ई.बी. कार्यालय इमारतीची दूरुस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगर अभियंता यांची दिनांक 23/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद इमारत मधील भाडेने दिलेल्या एम.एस.ई.बी. कार्यालय इमारतीची दूरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी सदर कार्यालयास जाण्यास जो जिना आहे तो अत्यंत खराब झाला असल्याने सदर जिन्या मधून नागरीकांची वरदळ खूप मोठया प्रमाणावर असल्याने नागरीकांचे जिवीतास हानी होवू शकते. त्यामुळे सदर जिना दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषद इमारत मधील भाडेने दिलेल्या एम.एस.ई.बी. कार्यालय इमारतीची दूरुस्ती करणेस मंजूरी देत आहे. सदरचे काम नगरपरिषद फंडातून करणेत यावे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा